कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील
अधिकाऱ्याची बदलीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश, क्रमांकः एलटीएस ११२३/प्र.क्र. ४९/२०२३/आ (वर्ग-१)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १५ मार्च, २०२३.

<u>शासन आदेश</u> :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार तसेच नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने प्रशासकीय सोईच्या दृष्टीने जलसंपदा विभागातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील खालील अधिकाऱ्याची बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सध्या धारण करीत असलेले पद | बदलीने पदस्थापनेचे पद |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रमोदकुमार नारायणराव वाकुडे | कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, चंद्रपूर. | सहायक मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर या रिक्त पदी. |

२. श्री.वाकुडे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर अन्य अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

३. संबंधित मुख्य अभियंता यांना कळविण्यात येते की, श्री.वाकुडे, कार्यकारी अभियंता यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करावे व त्यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपर्यंत स्थानिक व्यवस्था करुन अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्यात यावा.

४. श्री.वाकुडे, कार्यकारी अभियंता यांना कळविण्यात येते की, सदर नियुक्ती/ पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे व कोणत्या दिनांकास रुजू झाले याबाबत शासनास doesttclass१.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरित कळवावे.

५. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

६. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर शासन आदेश जलसंपदा विभागाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, संबंधितांनी ते डाऊनलोड करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

गसपरब

(ग. स. परब)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव (लाक्षेवि/प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व सह सचिव/ उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
९) संबंधित अधिकारी (मुख्य अभियंता यांच्यामार्फत).
१०) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई.
११) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१२) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.